# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्र बांधणीसाठी योगदान

**डॉ. तक्षशील एन.सुटे**
सहयोगी प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग
आनंद निकेतन महाविद्यालय, वरोर जि.चंद्रपूर
मो.नं. 8806609134
takshashilsutey@gmail.com

---

**सारांश -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कतृत्व पाहता कोणताही सद्सद् विवेक बुद्धीचा माणूस त्यांना अभिवादन करेल. स्वतंत्र होणाऱ्या भारताचा सर्वांगाने अखंड,सशक्त व बलशाली व्हावा यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर एकाच वेळी जातीभेद, धर्मभेद, वर्णभेद, लिंगभेद, वर्गभेद,गरिबी,अन्याय,अंधश्रद्धा,अशिक्षित व असुरक्षितता या समाजविघातक प्रवृत्ती विरुद्ध निकराने लढत होते. त्याच वेळी ब्रिटिशांच्या अन्याय,अत्याचाराच्या शासन व्यवस्था सोबतही ते लढत होते. या देशातील शोषित, पीडित, दुर्बल व मागास घटकातील समाजात मानवी हक्क अधिकाराची जाणीव करून देत होते.त्यासाठी येथील पारंपरिक व्यवस्थेवर तसेच ब्रिटिशांच्या साम्राज्यवादाच्या अन्यायकारी धोरणांवर वैचारिक प्रहार करीत होते. म्हणूनच महात्मा गांधींनी असे म्हटले होते की, 'डॉक्टर तुम्ही देशभक्तीचे खणखणीत नाणे आहात, तुम्ही सच्चे देशभक्त आहात.' पुढे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला भारतीय संविधानाच्या रूपात एक अनमोल असे तत्वज्ञान दिले की,ज्यात सर्व जात,धर्म,पंथ,भाषा,प्रदेश या विविधतेला एकसूत्रात बांधण्याचे व एक अखंड आणि सशक्त राष्ट्र निर्मितेचे कार्य केले.

**मूळ शब्द -**

देशभक्त, खणखणीत, राष्ट्रीयबाना, हिराकुड, दामोदर सांसदीय लोकशाही.

---

**प्रस्तावना -**

आधुनिक भारताची राष्ट्र म्हणून जडणघडण 1920 ते 1950 च्या दरम्यान झाली. नेमके याच कालखंडात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक राजकीय नेतृत्व भारतीय व्यवस्थेत दिसून येते. या कालखंडात भारतीय स्वातंत्र्याची चळवळ सुद्धा भारताच्या जडणघडणीसाठी आकार देत होती. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राष्ट्र बांधणीची पद्धती व उपाय भारतातील समकालीन नेत्यांपेक्षा वेगळी होती.तळागळातील शोषित,पीडित, मागास लोकांना राष्ट्रीय प्रवाहात आणल्याशिवाय भारत एक सशक्त राष्ट्र बनू शकणार नाही, याची जाण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना होती. म्हणूनच इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्याआधी भारतातील पारंपारिक व्यवस्थेतून मुक्त होणे गरजेचे आहे यावर त्यांनी अधिक भर दिलेला होता. पिढ्यानपिढ्या गुलामीत असलेल्या शोषित वंचितांचा लढा राष्ट्रउभारणीसाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी उभारला. सामाजिक संवाद व सहभाग याशिवाय राष्ट्रीय एकोपा निर्माण होऊ शकणार नाही.यासाठी त्यांनी विधीमंडळ, न्यायालय व प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून तीन्ही स्तरावरून राजकीय स्वातंत्र्याला बळकट करण्यासाठी सामाजिक लढे उभे केले.

Research Hub International Journal

**स्त्री-शुद्रातिशूद्रांसाठी कार्य -**

भारतात पिढ्यानपिढ्या लोक सामाजिक व मानसिक गुलामगिरी जगत होते. जात,धर्म,वर्ण भेदाला धार्मिक अधिष्ठान देऊन या देशातील बहुसंख्य लोकांवर स्पर्श बंदी ज्ञान बंदी लादली होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या सखोल वैचारिक मांडणीतून या भेदभावाला छेद दिला. त्यासाठी मोठे सामाजिक लढे उभे केले. माणसाला माणसापासून दूर करणारे हे विषमतेचे थोतांड आपल्या युक्तिवादाने उघडे पाडले. जगाने नोंद घ्यावी अशी समग्र मानव मुक्तीची चळवळ उभी केली. पाहता-पाहता महाड क्रांती चळवळ,काळाराम मंदिर चळवळ, या सामाजिक लढ्यापासून ते कामगार,शेतकरी, स्त्रिया,बेरोजगार इत्यादीसाठी व्यापक प्रमाणात यशस्वीपणे लढे उभे केले. येथील धर्मव्यवस्थेने निर्माण केलेले घाण साफ करत स्त्रियांसाठी 'हिंदू कोड बिल'तयार करून स्त्रियांच्या गुलाम मुक्तीचा दस्तावेज संसदेत मांडला.माणसामाणसातील सर्व भेद अमान्य करून सामाजिक समतेचे तत्व रुजविले.त्याला घटनात्मक आधार देऊन राष्ट्रीय प्रवाहात आणण्याचे मोलाचे कार्य केले. भारतीय संविधानात स्त्री हक्क मागासवर्गीयांच्या हक्क कलमबद्ध केले.आज देशातील स्त्रिया त्या उच्चवर्णीय असोत की मागासवर्गीय त्यांच्यात झालेला आमूलाग्र बदल नोंद घेण्यासारखा आहे आणि याचे श्रेय डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वज्ञानात आणि हक्काची सनद असलेल्या भारतीय संविधानात दिसून येते.

**ब्रिटिश धोरणांना विरोध** –

3 फेब्रुवारी 1928 ला भारतात सायमन कमिशन आले. या कमिशनला मदत करण्यासाठी सरकारने एक समिती नेमली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या समितीचे एक सदस्य होते. त्यामुळे देशातील अनेक नेत्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर टीका केली. वृत्तपत्राने निंदा करून ब्रिटिशांचे हस्तक म्हणून डॉक्टर आंबेडकरांनाही हिनवले.पण सायमन कमिशन पुढे साक्ष देऊन, एक निवेदन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सादर केले.त्यामध्ये त्यांनी शब्दाशब्दातून राष्ट्रहिताची मांडणी आणि आपल्या जहाल शब्दातून स्वातंत्र्याची मागणी केली होती. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे निवेदन स्तुती पूर्ण शब्दांमध्ये वर्तमानपत्रातून झळकू लागले. विरोध करणारे व विरोधी लिखाण करणारे प्रशंसा करू लागले.

अशीच दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे जी इतिहासात नोंदविली आहे, पण तिचा उल्लेख फार होत नाही. महात्मा गांधींनी इंग्रजांविरुद्ध असहकाराचे आंदोलन उभारले 1930 मध्ये पनवेल जवळ चिरनेर नावाचे छोटे खेडे.या गावात असहकाराचे आंदोलन शांततेकडून हिंसक वळण घेऊ लागले. यातच एक सरकारी मामलेदार ठार झाला. सरकार भडकले.कित्येकांना पकडून कैद केले. कोर्टात खटला सुरू झाला.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशभक्त आंदोलकांची बाजू घेऊन सरकारी साक्षीदारांची कोर्टात उलटतपासणी केली. आपल्या वैचारिक चातुर्यपूर्ण युक्तिवादातून उलटतपासणीनंतर आरोपी ठरविलेल्या अनेक आंदोलकांना आरोपातून मुक्त केले. तेव्हा वृत्तपत्रांचे अनेक रकाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रप्रेमाची साक्ष देत होते.

1930 च्या गोलमेज परिषदेत,आपल्या राष्ट्रहिताची साक्ष देत इंग्रजांच्या भूमीत इंग्रजांची कानउघाडणी करणारे भाषण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी केले.'कोणत्याही राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्रावर राज्य करण्याचा काहीच अधिकार नाही, इंग्रजांचे साम्राज्य जाऊन त्या जागी भारतीय लोक-प्रशासन प्रस्थापित व्हावे' ,अशी मुद्देसूद मांडणी गोलमेज परिषदेत त्यांनी केली.महात्मा गांधींनी या भाषणाचा वृत्तांत नंतर वर्तमानपत्रातून वाचला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरां प्रति महात्मा गांधी म्हणाले की, 'डॉक्टर,तुम्ही देशभक्तीचे खणखणीत नाणे आहात, तुम्ही सच्चे देशभक्त आहात.'

1942 मध्ये भारतात 'चलेजाव आंदोलन' तीव्र झाले.त्यात सरकारने अनेक आंदोलकांना पकडले.पंडित नेहरू, महात्मा गांधी असे मोठमोठ्या स्वातंत्र्य चळवळीच्या नेत्यांना कैदेत घेतले. तेव्हा अट्टल गुन्हेगारी कैद्याप्रमाणे या आंदोलक कैद्यांना ठेवू नये, ते राजकीय कैदी म्हणून फरक करण्यात यावा,असा राष्ट्रीय बाणी इशारा डॉ. आंबेडकरांनी व्हाइसरॉयच्या मंत्रिमंडळात मंत्री असूनही सरकारला दिलेला होता.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे पदवीसाठी केलेले संशोधनपर लिखाण सुद्धा देशभक्ती व देशप्रेमयुक्त दिसून येते. एम.ए चा प्रबंध लिहिताना 'ऍडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ दि ईस्ट इंडिया कंपनी' पी.एच.डी चा प्रबंध लिहितांना ,'दि इव्हॅल्युएशन ऑफ फायनान्स इन ब्रिटीश इंडिया' आणि डी.एस.सी.चा प्रबंध लिहितांना 'द प्रॉब्लेम ऑफ रुपी, इट्स ओरिजिन ऍंड सोल्युशन' असे ब्रिटिश धोरणावर टीका व ब्रिटिश सरकारचे मूल्यमापन करणारे प्रबंध निर्भीडपणे लिहिले होते. त्यांच्या लिखाणाला राष्ट्रीय किनार होती असे म्हणावे लागेल.

आर्थिक विकासाचे आधुनिक धोरण -

1942 ते 46 दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर ब्रिटिश मंत्रिमंडळात मजूर मंत्री होते.सोबतच त्यांच्याकडे बांधकाम खातेसुद्धा होते.कामगारांचे जीवन जवळून पाहिल्यामुळे गरीब मजूर कामगारांबद्दल त्यांना फार आत्मीयता होती.मंत्रिपदाच्या त्या चार वर्षाच्या काळात या देशाचे कामगार धोरण कसे असावे यासंबंधीची त्यांनी आखणी केलेली होती. आठ तासाचे काम, मध्यान्न सुट्टी, कामगार नुकसान भरपाई, भत्ता, प्रसूतीरजा, कर्मचारी वेतन आयोग, एम्प्लॉयमेंट एक्सचेंज सेवा आयोग ही कामगार व कर्मचाऱ्यांना दिलेली त्यांची देणगी आहे. विशेष म्हणजे पाणी आणि वीज यांच्या विकासाचेहे धोरण त्यांनी आखले होते.केंद्रीय जल आयोग व केंद्रीय वीज प्राधिकरण या कार्यरत असलेल्या यंत्रणांची सुरुवात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या वैचारिक दृष्टिक्षेपातून केली होती. दामोदर प्रकल्प, हिराकुड प्रकल्प, सोन नदी धरण,भाक्रा-नांगल बहुउद्देशीय प्रकल्प निर्मिती त्यांच्या मंत्रीपदाच्या काळातच सुरू झालेले होते. तसेच भारतातील प्रमुख विमानतळ सुद्धा त्यांच्याच काळात झालेले दिसून येतात.आर्थिक विकासाची नीटपणे घडी बसविणारे, चालना देणारे आणि आधुनिक भारताची बांधणी करणारे आर्थिक नियोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिले होते.

**सांसदीय लोकशाही -**

देशा-विदेशातील घटनांचा व शासन पद्धतीचा अभ्यास करून सर्वांना सामावून घेणारे संविधान लिहिले.या संविधानात समान मूल्य या तत्त्वाला प्रमाण मानून 'एक व्यक्ती, एक मत' या नियमाने देशातील श्रीमंत-गरीब, उच्च-कनिष्ठ,शहरी-ग्रामीण या सर्वांना राजकीय समता बहाल केली. सोबतच राजकीय लोकशाही यशस्वी करायची असेल तर सामाजिक व आर्थिक पातळ्यांवर सर्वांना समता व स्वातंत्र्य हवे अशी ठणठणीत मांडणी केली. येथील राजकीय लोकशाहीचे स्वरूप जातीय आहे, म्हणून राजकीय लोकशाहीला एकूणच भारताला बळकट करण्यासाठी डॉ.आंबेडकरांनी सामाजिक व आर्थिक लोकशाहीवर भर दिलेला होता.'कोणत्याही रक्त-पाताशिवाय क्रांतिकारक बदल घडवून आणणारी शासन पद्धती म्हणजे लोकशाही',असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. जमाव व झुंडीच्या राजकारणात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही बद्दलचे हे मत एक बहुमोलाची शिकवण आहे.

**बुद्धधम्माचा स्वीकार** –

हिंदू धर्म विषमतेवर आधारित आहे. त्यामुळे माणसा माणसात भेदभाव करून माणसाचीच छळवणूक करतो. यात सुधारणा करण्याचा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी खूप प्रयत्न केला.अनेक हिंदू नेत्यांशी चर्चा केली,सुधारणा सुचविल्या, त्यासाठी सत्याग्रह केले,अनेक प्रकारचे लिखाण केले, वृत्तपत्र चालवून प्रबोधन

Research Hub International Journal

करण्याचे कार्य केले, संविधान लिहिताना सर्वांना सामावून घेणारे हक्क व तरतुदी केल्या.तरीही हिंदूधर्म व्यवस्थेवर फारसा फरक पडला नाही.म्हणूनच शेवटचा उपाय म्हणून भारताच्या कुशीत वाढलेला तथागत बुद्धाचा धम्म त्यांनी स्वीकारला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आकसाने बुद्धधम्माच्या प्रवेश केलेला नव्हता, तर 1950 ला लोकशाहीवर आधारित भारतीय संविधान स्वीकारलेले होते. या संविधान तीन महत्त्वाच्या तत्वावर आधारित आहे. ही तीन तत्वे म्हणजे स्वातंत्र्य, समता,बंधुता ही होय. ही तिनेही तत्व मी फ्रान्सच्या राज्य क्रांतीतून स्वीकारलेली नाही तर माझे गुरु तथागत गौतम बुद्ध यांच्या तत्त्वज्ञानातून स्वीकारलेली आहे, असे त्यांनी संविधान समितीमध्ये स्पष्टपणे नमूद केलेले होते. म्हणूनच भारताच्या लोकशाहीला भारताच्या धर्मनिरपेक्षतेला आधुनिक भारताला घडविणाऱ्या व्यवस्थेला यशस्वी करण्यासाठी त्यांनी बुद्ध धर्म्माचा स्वीकार केलेला होता.या धम्म स्वीकारण्यातही त्यांचा अभेद राष्ट्रबाणा दिसून येतो.

**समारोप -**

भारत एक सशक्त राष्ट्र व्हावे या दृष्टीने इतके मोठे योगदान हा खरं तर मोठा सहयोग आहे.उच्च कोटीची देशभक्ती, राष्ट्रप्रेम, आत्मीयता व आपुलकी असल्याशिवाय इतके मोठे योगदान देणे शक्य नाही. देशातील साऱ्या शोषित-वंचित लोकांना हक्क व अधिकार याची तरतूद करताना सोबतच देशहित लक्षात घेऊन आधुनिक भारत घडविण्यासाठी आपल्या वैचारिक उंचीचा परिचय देत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी निष्ठेने व प्रामाणिकपणे या देशाच्या भवितव्याची बांधणी केली.म्हणूनच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे देशभक्तीचे खणखणीत नाणे आहेत.

**संदर्भ -**


- डॉ. सी. एच. निकुंभे - 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवाद वास्तव व विपर्यास' सुगावा प्रकाशन, पुणे-2008
- डॉ. सुखदेव थोरात - 'डॉ बाबासाहेब आंबेडकर नियोजन,जल व विद्युत विकास भूमिका व योगदान' सुगावा प्रकाशन पुणे.
- बबन कांबळे ( संपा.) - सम्राट महाविशेषांक 2016
- https / www.loksatta.com.b.r.amb


Research Hub International Journal